केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये लेखाशिर्ष २२१०H०१५, ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत अर्थसंकल्पिय तरतुद व पुरवणी मागणीमधून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना ऑगस्ट, २०२५ या माहिन्याचे मानधन रु.५३५९.२५ लक्ष एवढा निधी वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः पुरमा-३५२५/प्र.क्र.२८१/एनएचएम- सं. क्र.१२९२६००**

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १२ सप्टेंबर २०२५

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्र. बैठक-०२१९/प्र.क्र.१६९/आरोग्य-७, दिनांक १७ जुलै, २०२०
२) शासन निर्णय क्र. बैठक-१३२१/प्र.क्र.४२/२१/आरोग्य-७, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१
३) शासन निर्णय क्र. बैठक-५६२२/प्र.क्र.२२६/२१/आरोग्य-७, दिनांक १०, एप्रिल, २०२३
४) शासन निर्णय क्र. बैठक-५६२३/प्र.क्र.५३५/आरोग्य-७, दिनांक १४ मार्च, २०२४
५) शासन निर्णय क्र. बैठक-५६२३/प्र.क्र.५३५/आरोग्य-७, दिनांक २० सप्टेंबर, २०२४
६) शासन निर्णय क्र. आशा-५६२४/प्र.क्र.२५१/एनएचएम (ई. स. क्र.११०५३३८), दि.२८ मे, २०२५
७) शासन निर्णय क्र. आशा-५६२४/प्र.क्र.२५१/एनएचएम (ई. सं. क्र.११०५३३८), दि.२० जुन २०२५
८) शासन निर्णय क्र. आशा-५६२४/प्र.क्र.२५१/एनएचएम (ई.सं. क्र.११०५३३८), दि.२९ जूलै २०२५
९) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दिनांक ०७ एप्रिल,२०२५
१०) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. पुरक-२०२५/प्र.क्र.६५/अर्थ-३, दि.१४ जूलै, २०२५
११) सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे क्र. राआअ/राज्य शासन-निधी/ऑगस्ट २५ ते मार्च २६/ प्रस्ताव/५८०१२-५८०१८/२५, दिनांक १४ ऑगस्ट, २०२५

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यात आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक कार्यरत आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना, निकष व दराप्रमाणे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडयात मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानात नेमून दिलेल्या सेवांकरीता केंद्र शासनाने निर्धारित

केल्याप्रमाणे प्रोत्साहनात्मक मोबदला दिला जातो. तथापि, राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रम व इतर राष्ट्रीय आरोग्य विषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीत निधी रु.३२८६८.०० लक्ष व सन २०२५-२६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीमधून मंजूर रु.६३७०६.२५ लक्ष असे एकुण रु.९६५७४.२५ लक्ष इतके अनुदान राज्य शासनाकडून मंजूर झाले आहे. माहे एप्रिल, २०२५ ते जुलै, २०२५ या ४ महिन्याचे रु.३२४८७.१८ लक्ष इतके मानधन माहे जुलै, २०२५ अखेर आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना अदा करण्यासाठी वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच, माहे ऑगस्ट २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीचे मानधन अदा करण्यासाठी वाचा क्रमांक (११) येथील सहसंचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी त्यांच्या दि.१४/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे मानधन अदा करणेसाठी रु.६४०८७.०७ लक्ष इतक्या अनुदानाची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. या अनुषंगाने वित्त विभागाने आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे माहे ऑगस्ट, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीचे मानधन मासिक तत्वावर अदा करणेसाठी रु.६४०८७.०७ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. या अनुषंगाने आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांचे माहे ऑगस्ट, २०२५ चे मानधन वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना मोबदला अदा करण्यासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पीत तरतूदीमधून रु.३२८६८.०० लक्ष व सन २०२५-२६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये पुरक मागणीमधून मंजूर रु.६३७०६.२५ लक्ष असे एकुण रु.९६५७४.२५ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीत केलेली आहे. सदर अर्थसंकल्पीय तरतुदीतून माहे जुलै २०२५ पर्यंतचे मानधन रु.३२४८७.१८ लक्ष इतका निधी अदा करण्यात आला आहे. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर अर्थसंकल्पीत तरतूद व पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागणीद्वारे मंजूर तरतूदीतून आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना माहे ऑगस्ट, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीचे मानधन रु.६४०८७.०७ लक्ष इतका निधी लेखाशिर्ष

२२१०H०१५ मधून मासिक तत्वावर अदा करणेसाठी मान्यता दिली आहे. यास अनुसरुन आशा स्वयंसेविका व गटप्रवर्तक यांना माहे ऑगस्ट, २०२५ चे मानधन रु.५३५९.२५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करून विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी यांच्याकडे सुपुर्द करावी. यासाठी सह संचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर प्रस्तावावरील खर्च खालीलप्रमाणे नमूद लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२५-२६ साठी मंजूर करण्यात आलेल्या उपलब्ध तरतूदीतून भागविण्यात यावा.

| अ. क्र. | तपशिल | | | (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| | | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पिय व पुरवणी मागणी तरतुद सन २०२५-२६ | वितरीत रक्कम (राज्य हिस्सा) |
| १ | आर-१,<br>२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य; ०६, सार्वजनिक आरोग्य;<br>१०१-रोग प्रतिबंध आणि नियंत्रण<br>०२-किमान गरजा कार्यक्रम<br>(०२) (०१) आशा स्वयंसेविका व आशा गटप्रवर्तक यांना प्रोत्साहन (कार्यक्रम)<br>३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) | २२१०H०१५ | ९६५७४.२५ | ५३५९.२५ |

४. वित्त विभागाच्या दिनांक ०७ एप्रिल, २०२५ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.८ मधील मुद्दा क्र.१ ते १० मधील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचे कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक ०७ एप्रिल, २०२५ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र. १ ते १० मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/२०२२/ विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील नमूद अटी व शर्तींच्या अधिन राहून निधी वितरीत करण्यात येत आहे.

५. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत.

६. सदर अनुदान बिनशर्त आहे.

७. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२८०/२०२५ दिनांक २२/०८/२०२५ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६१२/२०२५ व्यय-१३ दिनांक ११/०९/२०२५ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१२१२५५२९९६१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ANIL SAWARE

Digitally signed by ANIL SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=073348b7a8767f0f7865422df1e65ce2f3bcdf6786e4712e2c088a9ac4ffee3f, postalCode=400032,
st=Maharashtra,
serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL SAWARE
Date: 2025.09.15 12:22:45 +05'30'

(अनिल वि. सावरे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा ), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
६. संचालक, (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
७. अति. संचालक, कुटुंब कल्याण कार्यालय, पूणे
८. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे .
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. नियोजन विभाग(का-१४७२), मंत्रालय, मुंबई.
१२. वित्त विभाग ( अर्थसंकल्प)/व्यय-१३, मंत्रालय, मुंबई.
१३. कार्यासन अर्थसंकल्प/लेखा, सार्वजनिक आरोग्य विभाग .
१४. निवडनस्ती ( एनएचएम) .